कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/कोनास्प/२०२६-२७/७१४
दि. ०७/०७/२०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्यावतीने कोंकणी नाटयस्पर्धेचा सुवर्णमहोत्सवी समारंभ शुक्रवार दि. १० जुलै २०२६ रोजी मा. दिनानाथ मंगेशकर कला मंदिर, पणजी येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमात गोव्याचे प्रसिध्द नाटयलेखक श्री. पुंडलिक नारायण नायक यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

त्यानिमित्त सांय. ३.०० वा. **'समकालीन भारतीय रंगभूमीवर कोंकणी नाटक'** या विषयावर कला अकादमीच्या कृष्ण कक्षात परिसंवाद आयोजित करण्यात आला असून डॉ. जयंती नायक, श्री. वसंत भगवत सावंत, श्री. निलेश महाले व डॉ. नारायण खराडे हे या कार्यक्रमात सहभागी असणार आहेत. तर जेष्ठ नाटयकर्मी श्री. श्रीधर कामत बांबोळकर हे या परिसंवादाचे अध्यक्ष असतील.

त्यानंतर मुख्य कार्यक्रम सांय. ५.०० वा. मा. दिनानाथ मंगेशकर कला मंदिरात होणार असून गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. कला व संस्कृती मंत्री, डॉ. रमेश तवडकर, सन्माननीय अतिथी तर कला अकादमीचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत (बाबू) कवळेकर, हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी असतील. कला अकादमीचे उपाध्यक्ष, श्री. प्रवीण गांवकर, गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष, डॉ. पुर्णानंद च्यारी, कला अकादमीचे सदस्य सचिव, श्री. शंकर बा. गांवकर यांची खास उपस्थिी असणार आहे.

याप्रसंगी कोंकणी नाटयस्पर्धेत आपले बहुमूल्य योगदान दिलेल्या ३० नाटय कलाकारांचा सन्मान केला जाईल. त्यात **दिग्दर्शन**-श्री. प्रमोद म्हाडेश्वर, श्री. निलेश महाले, श्री. सुशांत नायक, **लेखन**-डॉ. प्रकाश वझरीकार, डॉ. जयंती नायक, श्री. मुकेश थळी, श्री. झिलू गांवकर, श्री. वसंत भगवंत सावंत, श्री. दिपराज सातोर्डेकर, डॉ. राजय पवार, **अभिनय**-श्री. मयुर मयेकर, श्री. तुळशीदास धोणशीकर, श्री. व्यंकटेश गावणेकर, श्री. प्रशांत सतरकर, श्री. शेखर उसगांवकर, **अभिनय**-श्रीमती सुकांती हिरु नायक, श्रीमती माधुरी शेटकर, श्रीमती गौरी कामत, श्रीमती मनुजा शेट नार्वेकर लोकूर, श्रीमती खुशबू कवळेकर, **प्रकाशयोजन**-श्री. सिध्दार्थ हळर्णकर, श्री. विकास चोपडेकर, **पार्श्वसंगीत**-श्री. सचिन चौगुले, श्री. दिलीप वझे, **रंगभूषा**-श्री. प्रेमानंद पोळे, श्री. एकनाथ नाईक **वेशभूषा**-श्रीमती गीता बांबोळकर, श्रीमती नताशा महाले, **नेपथ्य**-श्री. किरण नाईक, श्री. योगेश कापडी.

या कार्यक्रमाला जोडून ५०व्या कोंकणी नाटयस्पर्धेचा पारीतोषिक वितरण समारंभ संपन्न होणार आहे व नंतर कला अकादमी रंगमेळतर्फे श्री. पुंडलिक नारायण नायक लिखित आणि प्रा. दिपक शंकर आमोणकर दिग्दर्शित कोंकणी नाटक **'पिंपळ पेटला'** सादर होणार आहे.

सदर समारंभास पारितोषिक विजेते, नाटय कलाप्रेमी व रसिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)